दैनिक

# लोकांकीत

सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र

मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • शुक्रवार दि.११ सप्टेंबर २०२६ • अंक-१२९ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.


### आता फक्त राष्ट्रपती भवन गुजरातला नेणे बाकी

**मुंबई**-राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा दिल्लीऐवजी गुजरातमधील केवडिया येथे आयोजित करण्याच्या निर्णयावरून राजकीय वातावरण तापले असतानाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. केंद्र सरकार गुजरातचे आहे की संपूर्ण देशाचे? असा थेट सवाल करत त्यांनी राष्ट्रीय पुरस्कार, मोठे क्रीडा कार्यक्रम, उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रकल्प गुजरातकडे वळवले जात असल्याचा आरोप केला. एवढेच नव्हे तर, आता फक्त राष्ट्रपती भवन गुजरातला नेणे बाकी आहे, असा खोचक टोला त्यांनी लगावला. मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत आदित्य ठाकरे यांनी विविध मुद्द्यांवर सरकारला घेरले.

# एमपीएससी वाचवायची असेल तर अध्यक्ष बदला-रोहित पवार

## विवेक भीमनवारांचा राजीनामा घेऊन तुकाराम मुंढेंना अध्यक्ष करा, अन्यथा १६ सप्टेंबरपासून आंदोलन

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आमदार रोहित पवार यांनी गुरुवारी मागणी केली की, जर एमपीएससी वाचवायची असेल तर आयोगाचा अध्यक्ष बदलला पाहिजे. त्यांनी विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार यांचा राजीनामा घेऊन त्यांच्या जागी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्याची मागणी केली. अन्यथा, १६ सप्टेंबरपासून आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.एमपीएससी संयुक्त गट-क परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. या परीक्षेचा पेपर फुटल्याची शक्यताही व्यक्त होत आहे. त्यामुळे ही परीक्षा जानेवारीऐवजी ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात घ्यावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. तसेच, परीक्षा ऑनलाइनऐवजी ऑफलाइन पद्धतीने घ्यावी, असेही विद्यार्थी म्हणत असल्याचे पवार यांनी सांगितले.राज्यात सुमारे ४५ लाख विद्यार्थी स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी होण्याचे स्वप्न पाहतात. पुण्यात राहून तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक भार सहन करावा लागतो. प्रथमेश देशमुखच्या आत्महत्येचा उल्लेख करत, पवार म्हणाले की सरकारने आर्थिक अडचणी, कर्जबाजारीपणा आणि परीक्षांमधील अनिश्चितता याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. खासगी कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी कमी झाल्यामुळे मोठ्या संख्येने विद्यार्थी स्पर्धा परीक्षांकडे वळत आहेत.

दरवर्षी किती पदभरती होणार, याबाबत विद्यार्थ्यांना स्पष्टता दिली पाहिजे. परीक्षांमधील गैरकारभाराबाबत अनेक पुरावे आपल्याकडे आले असून, हा प्रकार अनेक वर्षांपासून सुरू असल्याचे दिसून येते, असेही पवार यांनी सांगितले.पेपरफुटीबाबत एमपीएससीच्या सचिवांनी सुरुवातीला नकार दिला होता, पण नंतर त्यांना ती बाब मान्य करावी लागली, असा दावा पवार



यांनी केला. पोलिसांच्या माहितीनुसार, पेपर परीक्षा होण्याच्या दोन दिवस आधी फुटला होता. मात्र, त्यापूर्वीच पेपर बाहेर गेल्याचे पुरावे आपल्याकडे असल्याचा दावाही त्यांनी केला. 'दोन महिने पेपर फुटला असेल तर आयोग झोपला होता का?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

हा पेपर अनेकांपर्यंत पोहोचल्याचा दावा करत, या प्रकरणात मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा संशय असल्याचेही पवार म्हणाले. या प्रकरणी आपल्याकडील पुरावे तपास यंत्रणेला दिल्याचे त्यांनी सांगितले.

पवार यांनी परिवहन विभागातील गैरव्यवहारांवरही आरोप केले. एचएसआरपी नंबरप्लेट, इंटरसेप्टर वाहने, रडार, जीपीआरएस आणि ई-चलन प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे त्यांनी म्हटले. काही प्रकरणांमध्ये एसआयटी चौकशीतही गैरव्यवहाराच्या गोष्टी समोर आल्याचा दावा त्यांनी केला.आरटीओमध्ये ज्या प्रकारचे रॅकेट समोर येत आहे, त्याच धर्तीवर एमपीएससीमध्येही अशीच व्यवस्था कार्यरत असल्याचा संशय आहे, असे पवार म्हणाले.

# पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्तपदी अण्णा बनसोडे यांची निवड

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक वारसा पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहणार

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारणीची महत्त्वपूर्ण बैठक मुंबईतील गरवारे क्लब येथे केंद्रीय मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष तथा आमदार अण्णा बनसोडे यांची पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्तपदी नियुक्त करण्याची घोषणा करण्यात आली. कार्यकारणीच्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

अण्णा बनसोडे यांची विश्वस्तपदी निवड झाल्याने पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याला नवी दिशा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी व्यक्त केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक परिवर्तनाचे कार्य पुढे नेण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असा विश्वास विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला.



विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा विस्तार करणे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक वारसा पुढे नेण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार असल्याचेही अण्णा बनसोडे यांनी यावेळी सांगितले.यावेळी कार्यकारिणीच्या बैठकीत संस्थेचे अध्यक्ष रामदास आठवले, सुखदेव थोरात, संचालक उज्ज्वल निकम, डॉ.वासुदेव गाडे, बी.के.बर्वे,विश्वास पाटील, डॉ. वेंकटा स्वामी, अरविंद सोनटक्के, डॉ.एस. एक. भागवत उपस्थित होते.

# दिव्यात घरफोडी करून सोन्याचे दागिने लांबवणारे जेरबंद

## दिवा पोलिसांकडून ६.५२ लाखांचे सोने हस्तगत

**संतोष पडवळ । ठाणे**

दिवा परिसरात घरफोडी करून सोन्याचे दागिने पळवणाऱ्या टोळीचा मुंब्रा पोलिसांच्या दिवा तपास पथकाने अवघ्या काही दिवसांत पर्दाफाश केला आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या अचूक माहितीच्या आधारे पोलिसांनी तीन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपींकडून तब्बल ६ लाख ५२ हजार ५०० रुपये मूल्याची ४४.५६० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.




मुलीच्या ओळखीचा फायदा घेत चोरी ७ सप्टेंबर २०२६ रोजी दिवा पूर्व येथील रहिवासी संतोष जाधव यांच्या बंद घराचा फायदा घेत चोरट्याने ४५ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र लांबवले होते. याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरली. तपासात फिर्यादीच्या मुलीशी ओळख असलेल्या अनमोल श्रीवास्तव (१८) यानेच घरफोडी केल्याचे उघड झाले. चोरीचा हा ऐवज त्याने मित्र अक्षय कदम (२३) याच्याकडे विक्रीसाठी सोपवला होता. दागिने वितळवून बनवली सोन्याची लगड अक्षय कदम याने पैशांची गरज असल्याचे भासवून कोणत्याही पावतीशिवाय हे मंगळसूत्र मालाड येथील 'निर्माई ज्वेलर्स'चा मालक सुदीप सामंता (२४) याला विकले. सुदीपने तात्काळ ते सोन्याचे दागिने वितळवून त्याची लगड तयार केली. मात्र, पोलिसांनी कौशल्याने सुगावा लावत अनमोल, अक्षय आणि सोनार सुदीप या तिघांनाही ताब्यात घेतले आणि चोरी गेलेला पूर्ण ऐवज सोन्याच्या लगडीच्या रूपात जप्त केला.

**नागरिकांना सुरक्षिततेचे आवाहन**

वरिष्ठ पोलीस मा. गणेश जवादवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा पोलिसांच्या तपास पथकाने ही धडक कारवाई केली. या यशस्वी कारवाईनंतर पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. घरात अनोळखी व्यक्ती किंवा कामगारांना एकटे सोडू नये, बाहेरगावी जाताना मौल्यवान ऐवज अथवा मोठी रोकड घरात ठेवू नये आणि घराची चावी केवळ विश्वासातील व्यक्तीकडेच द्यावी, असे आवाहन मुंब्रा पोलिसांनी केले आहे.

# नवीन पनवेलच्या रोज बाजारात अनधिकृत टपऱ्यांचा विळखा : रात्री उशिरापर्यंत सुरु राहणाऱ्या चायनीज स्टॉल्समुळे महिलांची सुरक्षा धोक्यात

## फूटपाथ गिळंकृत; उघड्यावरील खाद्यपदार्थांमुळे आरोग्याचा प्रश्न; पालिका अधिकाऱ्यांवर हप्तेखोरीचे आरोप, कारवाईचे आश्वासन

**पनवेल । विशेष प्रतिनिधी**

नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील सेक्टर १७ येथे सिडकोने तात्पुरत्या स्वरूपात फेरीवाल्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या ‘रोज बाजारा’चे स्वरूप आता पूर्णपणे बिघडले आहे. या परिसरात नियमबाह्य टपऱ्या उभारून मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची अनधिकृत विक्री सुरू असल्याने सामान्य नागरिकांना चालणेही मुश्कील झाले आहे.



**मध्यरात्री २ वाजेपर्यंत चायनीज सेंटर्स; समाजकंटकांचा वावर**

रोज बाजारातील टपऱ्या परस्पर भाड्याने देऊन तिथे उघड्यावर चायनीज कॉर्नर थाटण्यात आले आहेत. नागरिकांच्या दाव्यानुसार, ही सेंटर्स मध्यरात्री १ ते २ वाजेपर्यंत सुरू असतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी मद्यपी आणि गर्दुल्ल्यांचा वावर वाढला असून परिसरातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. टपऱ्यांच्या आडून अंमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याचा संशयही व्यक्त होत असून याची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

> **रोज बाजार परिसरातील अनधिकृत गाड्या आणि बेकायदेशीर टपऱ्यांवर महापालिकेकडून लवकरच कठोर कारवाई केली जाईल.**
> **– महेश कुमार मेघमाळे, अतिरिक्त आयुक्त, पनवेल महानगरपालिका**

**उघड्यावरील अन्नाने आरोग्याचा खेळ, 'हप्तेखोरी'ची चर्चा**

खाद्यपदार्थांचा कचरा आणि सांडपाणी थेट रस्त्यावर व गटारात फेकले जात असल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. या विक्रेत्यांकडे महापालिकेचा परवाना अथवा अन्न व औषध प्रशासनाची (FDA) कोणतीही अधिकृत परवानगी नाही. वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्यामुळे, पालिका अधिकाऱ्यांच्या संगनमतानेच ही ‘हप्ते वसुली’ सुरू असल्याचा गंभीर आरोप संतप्त नागरिकांनी केला आहे.आता पालिका प्रशासन केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कारवाई करून फूटपाथ मोकळे करणार का आणि हप्तेखोरीच्या आरोपांची चौकशी होणार का, याकडे संपूर्ण नवीन पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.

# प्रथम काव्यमोती कवी संमेलन उत्साहात संपन्न

**मुंबई । प्रतिनिधी**

रविवार दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी संदीप स्टुडिओ ठाणे येथे प्रथमच काव्यमोती कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. संकल्पना- आयोजक- नियोजक आणि सुत्रसंचलन सौ. विद्या डोंबे यांची आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जेष्ठ कवी नार्वेकर यांनी भक्ती गीत सादर केले आहे. त्या नंतर, जेष्ठ पत्रकार श्री सुकृत खांडेकर, जेष्ठ साहित्यिका व कवयित्री सौ. अनघाताई राणे, जेष्ठ समाजसेवक श्री शशिकांत सावंत, माजी सेन्सर बोर्ड सदस्य श्री विलास खानोलकर, सहाय्यक करनिर्धारक व संकलक अधिकारी मनपा श्री नासिर खान आणि मैत्री संस्था मुंबई अध्यक्ष श्री सुरज भोईर यांच्या हस्ते काव्य मंचावर दीप प्रज्वलन करून गणेश पूजन व वंदना करण्यात आले. ह्या कार्यक्रमाचे सर्वेसर्वा सौ. विद्या डोंबे यांनी 'प्रास्ताविक' केले. काव्य मंचावर उपस्थित मान्यवरांचे 'सत्कार' करण्यात आले. आणि निमंत्रित २१ कवींनी प्रत्येकी २ कविता वेगवेगळ्या प्रकारे २ सत्रात कविता सादर केल्या. काव्य मंचावर जणू काही एकापेक्षा एक लहान मोठे काव्य मोती सादर होत होते. त्यास उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे टाळ्यांच्या गजरात 'प्रतिसाद' दिला.




मान्यवरांनी थोडक्यात 'मार्गदर्शन' केले. तसेच, मान्यवरांच्या हस्ते प्रत्येक कवींना मानाचे सन्मानपत्र देऊन 'गौरविण्यात' आले. सर्व उपस्थितांना सुरुवातीला 'चहा व बिस्किटे' देण्यात आली. मध्यंतर मध्ये 'पोटभर अल्पोपहार' देण्यात आले. बाहेर ऊन पाऊसाचा खेळ चालू असताना, आत मध्ये मात्र, शब्दांचा अक्षरशः पाऊस पडत होता. अशा प्रकारे रंग शब्दांचा- गंध शब्दांचा, साज मनीचा भाव - भावनांचा ! प्रथम 'काव्यमोती कवी संमेलन' शिस्तबद्ध पण 'आनंदी व प्रसन्न' वातावरणात यशस्वी झाले. आणि सर्व कवींनी जाताना कौतुक व समाधान व्यक्त करत, सौ विद्या डोंबे यांचे 'अभिनंदनही' केले.

# ठाणे महापौरांच्या हस्ते १५ शिक्षकांना आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार




**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते ठाणे महापालिका क्षेत्रातील १५ शिक्षकांना ‘आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. राम गणेश गडकरी रंगायतन येथे झालेल्या या कार्यक्रमात शिक्षकांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला. महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास सभागृह नेते हणमंत जगदाळे, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अशोक बागवे, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त डॉ. मिताली संचेती, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, शिक्षणाधिकारी ओंकार बजागे, लेखाधिकारी चांगदेव, गटाधिकारी संगीता बामणे आदी उपस्थित होते.

महापालिका क्षेत्रातील परवीन सय्यद, लता देवकर, किरण इंगोले, विनीता राणे, प्रांजली निजाई, सुनीता महाजन, विद्या जाधव, विनिता भंगाळे, अख्तार अहमद, मोहम्मद शेख आणि सोहेल खलील, तसेच खाजगी अनुदानित शाळांमधील दत्तात्रय बिन्नर, माधुरी अलई, कल्पना सपकाळे आणि शोभा मोरे यांना आदर्श शिक्षक महापौर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय ठाणे महापालिका शिक्षण विभागाची धुरा सांभाळणाऱ्या गटाधिकारी संगीता बामणे, गटप्रमुख विश्वास कोल्हे आणि विज्ञान शिक्षक रमेश बोरोले यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच गटप्रमुख निलीमा पाटील आणि केंद्रप्रमुख आशा पाटे यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

प्रसंगी महापौर शर्मिला पिंपळोलकर म्हणाल्या की, शिक्षक हा केवळ वर्गात धडा शिकवणारा नसतो, तर तो विद्यार्थ्यांना विचार करायला, स्वप्ने पाहायला आणि अपयशातून पुन्हा उभे राहायला शिकवतो. आज ज्या शिक्षकांना पुरस्कार मिळत आहे, त्यांनी आपल्या कार्यातून हे सिद्ध केले आहे. हा पुरस्कार केवळ सन्मानचिन्ह नसून त्यांच्या अनेक वर्षांच्या प्रामाणिक परिश्रमांना, त्यागाला आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या निष्ठेला मिळालेली पावती आहे.

# आदित्य यशवंत घरत यांची उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी निवड

## पक्षाने दाखविलेला विश्वास जनसेवा आणि संघटनबांधणीतून सार्थ ठरवू–आदित्य घरत

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ,कट्टर,प्रामाणिक कार्यकर्ते, कामगार नेते, काँग्रेसचे जेष्ठ नेते महेंद्रशेठ घरत यांचे अत्यंत जवळचे विश्वासू सहकारी म्हणून कार्यरत असलेले आदित्य यशवंत घरत यांची निवड करण्यात आली आहे.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत यांच्या शुभ हस्ते आदित्य घरत यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.या निवडीबद्दल आदित्य घरत यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत यांचे तसेच सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.माझी उपाध्यक्षपदी निवड करून माझ्यावर विश्वास व्यक्त केल्याबद्दल मी दोन्ही मान्यवरांचा मनःपूर्वक आभारी आहे. ही निवड माझ्यासाठी केवळ पदाची जबाबदारी नसून काँग्रेस पक्षाची विचारधारा, लोकशाही मूल्ये आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा आहे, अशी भावना आदित्य घरत यांनी व्यक्त केली.उरण तालुक्यात काँग्रेस पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी, जनतेच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी तसेच समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि सातत्याने कार्यरत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.माझ्यावर दाखविलेला विश्वास जनसेवा, संघटनबांधणी आणि लोकहिताच्या कार्यातून सार्थ ठरविण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेन. आपला विश्वास, आपले मार्गदर्शन आणि जनतेची साथ हीच माझी खरी ताकद आहे, असा विश्वासही आदित्य यशवंत घरत यांनी व्यक्त केला.काँग्रेस पक्षाचा, पक्षाच्या ध्येय धोरणाचा आदित्य घरत यांनी तळागाळात प्रचार व प्रसार केला असून पक्षासाठी रात्रंदिवस झटणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. कट्टर एकनिष्ठ व प्रामाणिक कार्यकर्ते असल्यामुळे आदित्य घरत यांची उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे.या निवडीमुळे उरण तालुका काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आदित्य घरत यांच्या पुढील वाटचालीसाठी विविध स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# गणेशोत्सवासाठी कर्जत पोलिसांची जय्यत तयारी!

## शांतता–मोहल्ला कमिटीची बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**कर्जत । जयेश जाधव**

आगामी गणेशोत्सव २०२६ शांततेत, सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी कर्जत पोलीस ठाण्यात गणेशोत्सव मंडळे, शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी सदस्य तसेच ड्ज मालकांची संयुक्त बैठक मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी कर्जत पोलिस ठाणे येथे घेण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीस ५६ सदस्य उपस्थित होते.बैठकीत गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, यासाठी मंडळांनी आवश्यक त्या सर्व शासकीय परवानग्या घ्याव्यात, कार्यक्रमाची वेळ, ठिकाण व अपेक्षित गर्दीची माहिती पोलिसांना पूर्वसूचित करावी, अशा सूचना देण्यात आल्या.गणेश आगमन व विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांचा वापर करावा.





कर्कश आवाज करणाऱ्या ड्ज सारख्या वाद्यांचा वापर करू नये, तसेच ध्वनिक्षेपक व लाऊडस्पीकरचा वापर शासनाच्या निर्धारित नियम व वेळेच्या मर्यादेतच करावा, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. धार्मिक भावना दुखावतील अशी गाणी अथवा देखावे करू नयेत, असेही बजावण्यात आले. गणेश मंडळांच्या मंडपात व बाहेर उउढत कॅमेरे बसवावेत, तसेच दिवसा व रात्री स्वयंसेवकांची नियुक्ती करावी. मिरवणुकीदरम्यान भांडण, हुल्लडबाजी अथवा अनुचित प्रकार होणार नाही, याची जबाबदारी आयोजकांनी घ्यावी.विसर्जनावेळी लहान मुले पाण्यात उतरणार नाहीत याची विशेष दक्षता घ्यावी आणि निर्धारित वेळेतच विसर्जन करावे, अशाही सूचना देण्यात आल्या. मंडपासाठी विद्युत जोडणी घेताना चडएइची परवानगी घेणे तसेच बॅनर, फ्लेक्स व जाहिरातींसाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.गणेशोत्सव काळात पोलीस प्रशासन व संबंधित शासकीय यंत्रणांनी दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करून उत्सव शांततेत व सुव्यवस्थित पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन कर्जत पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# भाडेकरूंची माहिती बंधनकारक असतांनाही बाणेर, बालेवाडी, सुस, म्हाळूंगे, सोमेश्वर,पाषाण मधील अनेकांच्या नोंदी नाही

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे शहरातील बाणेर, बालेवाडी, पाषाण , औंध, सुस, म्हाळुंगे, सोमेश्वर या ठिकाणी अनेकांनी नियमांचे पालन करण्यात घरमालक दुर्लक्ष करत आहे . शहरात अनेक वेळेस दहशतवादी कारवाई संबंधित व्यक्ती या ठिकाणी राहून ईतर ठिकाणी अवैध कारवाई करत आहे . यावर पोलिस ठाण्यात नोंदी असतांनाही यावर स्थानिक पोलिस ठाणे कारवाई करत नाही घरमालक घरे भाड्याने देतांना शासकिय नियमानूसार भाडे करार करत नसल्याचे दिसत आहे . अनेक ठिकाणी राजकिय लोकांचेच तसेच त्यांच्या आश्रयाखाली असणा–या लोकांनीच खाली जागेवर टिन शेड उभारून खोल्या भाड्याने देण्याचा प्रयत्न केला आहे. घरे, फ्लॅट, आणि खोल्या भाड्याने दिले जातात . मात्र भाडेकरू कोण आहे . तो कोठून आला याचा पुर्व इतिहास काय आहे .याबाबत आणि खोली भाड्याने देणारे मालक शासकिय नियमाने भाडे करार करत नसल्याचे दिसत आहे बाणेर , बालेवाडी, पाषाण, औंध, सुस, म्हाळूंगे याठिकाणी एका एका जागा मालकाने खाली जागेवर टिन शेड उभारून शंभर शंभर खोल्या भाड्याने दिलेल्या आहे . शासनाच्या नियमाने खोल्या भाड्याने दिलेले नसतांनाही यांना महापालिके कडून नळ कनेक्शन कसे दिले जातात. याच प्रमाणे विद्यूत मिटर कसे दिले जातात हा एक प्रश्न उपस्थित होत आहे. अनेक वेळेस घर आणि दूकाने भाड्याने दिले जातात याबाबत दैनिक लोकांनीच वृत्तपत्राने अनेक वेळेस वृत्त दिलेले असतांनाही यावर प्रशासनाने ठोस पावले उचलली नव्हती . शहरात शिक्षण, नोकरी, व्यवसाय, घरकाम करणारे राज्यासह ईतर राज्यातील नागरिक येथे येतात यांचा पुर्व इतिहास न पाहता अनेक ठिकाणी भाड्याने दिल्या जात आहे . याबाबत पोलिस नियमाने यांची चौकशी करत नसल्याने गुन्हा किंवा देशद्रोही , देशविघातक कृत्य केल्या बाबत माहिती मिळत नाही .घरमालकाकडील भाडे करूनची माहिती नोंद पोलिस ठाण्यात न केल्यास घरमालकाला पुढील काळात पोलिस चरित्र पडताळणी ,पासपोर्ट, आणि कायदेशिर बाबी तसेच प्रक्रिये दरम्यान अडचणींचा सामना करावा लागू शकतो . भाडे करूची माहिती लपविल्यास गुन्हा ठरत असतांनाही राजकिय आश्रय खाली असणारे हे महाभाग कोणासही घाबरत नसल्याचा प्रकार पुढे येत आहे. भाडेकरूंची माहिती पोलिसांकडे नोंदणी बंधन कारक आहे . याची माहिती न दिल्यास घरमालका विरोधात गुन्हा दाखल होऊ शकतो .







।।।। पोलिस ठाणे भाडे करी कोण यांच्या नोंदी करणार काय ? ।।।।

भाडेकरूंची संपूर्ण माहीती घेणार काय . ओळखपत्र आणि संपूर्ण माहीती नोंदविणार काय, परराज्यातील नागरिकांच्या नोंदी करण्यात येणार काय. अनेक ठिकाणी नियमा विरोधात भाड्याने घरे , दुकाने टिन शेड उभारून शासनाच्या नियमाने न देता यावर कारवाई करणे गरजेचे आहे .

।।।। महापालिकेचे आयुक्त, अधिकारी नियमा विरोधात घरे भाड्याने दिलेल्या मालकावर कारवाई का करत नाही ।।।।

या विभागात खाली जागा मालकांनी टिन शेड उभारून खोल्या, दूकाने भाड्याने अनेक वर्षा पासून दिलेल्या असतांनाही यांच्या नोंदीच महापालिकेकडे नाही . असे असतांनाही यांना नळ कनेक्शन कसे दिले गेले आणि यांच्या कडून नळपट्टी, घरपट्टी कशी वसूल केली जात आहे याचं प्रमाणे महापालिकेची या घरांना परवानगी नसतांनाही विद्यूत मिटर कसे दिल्या गेले हा सर्व प्रकार म्हणजे अर्थकारणात गुंतलेला आहे. नियमा विरोधात टिन शेड उभारायचे आणि शासनाच्या नियमा नूसार भाडे करार न करता खोली, घरे , दुकाने भाड्याने दिली जातात मग महापालिका झोपेचे सोंग घेत असल्याचे दिसत आहे . या विभागात दहा ते पंधरा हजार घरे नियमा विरोधात भाड्याने दिलेले आहे. राजकिय आश्रय खाली असणारे आणि नियमा विरोधात घरे , दुकाने ,खोल्या भाड्याने देणे कोणत्या नियमात बसते . अनेक राजकिय यांचे कार्यकर्ते ,नातेवाईक , आणि स्वतः नियमा विरोधात कार्य करत असतांनाही गेल्या दहा वर्षात महापालिका , पोलिस ठाणे, विद्रूप विभागाने कारवाई का केली नाही हा एक प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे .

दैनिक लोकांकीत



# प्रा.अमोलकुमार वाघमारे यांचा पालिका शिक्षण विभागा कडून शिक्षक दिनी गौरव

**राबाडा । प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका संचलित पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आंबेडकर नगर रबाळे नवी मुंबई येथील क्रीडा शिक्षक प्रा अमोलकुमार वाघमारे यांचा शिक्षक दिनी सौ रंजना सोनवणे सभापती, सभापती,समाज कल्याण समिति,सौ ललिता मढवी सभापती फ प्रभाग समिति,सभापती डॉ.

जयाजी नाथ यांच्या हस्ते व पालिका सचिव व उपायुक्त शिक्षण विभाग सौ संघरत्ना खिलारे शिक्षण अधिकारी अशोक कडूस यांच्या प्रमुख उपस्थितीत उपक्रमशील, अष्टपैलू, हरहुन्नरी शिक्षक म्हणून गुणगौरव करण्यात आले. प्रा.वाघमारे हे गेली १६ वर्षे अविरत पणे नवी मुंबई महानगरपालिका संचलित पीएम श्री राजर्षी शाहू महाराज विद्यालय आंबेडकर नगर रबाळे नवी मुंबई येथे क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत आहेत त्यांनी शालेय शिक्षणा सोबतच कला , क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात विद्यार्थी घडवण्यासाठी सतत अग्रेसर राहून कार्य करत आहेत त्यांनी शेकडो राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळाडू घडवले ते आज आर्मी,पोलिस,रेल्वे, शिक्षक तसेच प्रशासकीय कार्यालयात विविध




ठिकाणी वेगवेगळ्या पदांवर काम करत आहेत केवळ शिक्षण नव्हे तर सामाजिक बाबतीत ही कामाची चुणूक दाखवली आहे. अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसन मुक्ती, पर्यावरण संरक्षण, पोलिओ लसीकरण, एड्स जनजागृती, कुटुंब कल्याण, रक्तदान व अवयवदान,स्वच्छ सर्वेक्षण या विषयावर समाज प्रबोधन पर व्याख्यान, चर्चासत्र,आरोग्य शिबिर, प्रभात फेरी मधून लोकांना जागृत करण्याचे काम केले आहे. शालेय परिपाठ मध्ये विद्यार्थ्यांनी विविध समाज सुधारक यांच्या जयंती पुण्यतिथी व सणाच्या निमित्ताने योग्य ती माहिती देऊन त्यांना ही जागृत करण्याचा प्रयत्न ते सातत्याने करत आहेत. शाळा बाह्य विद्यार्थी, जनगणना, मराठा आरक्षण सर्वेक्षण, सार्वत्रिक निवडणूक मतदान प्रक्रिये मध्ये अधिकारी म्हणून उत्तम काम केले आहे. राज्य व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजनात मैदान आखणी, पंच कार्य, समालोचन करून सक्रिय सहभाग घेतला आहे. तसेच विविध क्रीडा व सामाजिक संघटनेवर ते पदाधिकारी म्हणू उत्तम काम करीत आहेत म्हणून त्यांचा विशेष गुणगौरव करण्यात आला.

## जलसुरक्षा, स्वच्छता आणि चक्राकार साधन संपत्ती व्यवस्थापनावर सरकार व उद्योगांच्या मुख्य भरानंतर मुंबईत 'आयफॅट इंडिया २०२६' चे उद्घाटन

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

पाणी, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन आणि रिसायकलिंग उपायांसाठी देशातील सर्वात मोठे व्यापार प्रदर्शन असलेल्या 'आयफॅट इंडिया'च्या १३ व्या आवृत्तीचे उद्घाटन बॉम्बे एक्झिबिशन सेंटर (NESCO), मुंबई येथे झाले. उद्घाटन सोहळ्यात अग्निमित्रा पॉल (माननीय प्रभारी मंत्री, नगर विकास आणि नगरपालिका व्यवहार, पश्चिम बंगाल सरकार), ईशा कालिया, IAS (संयुक्त सचिव आणि मिशन डायरेक्टर - NULM व PM स्वनिधी, गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय) तसेच विविध राज्य सरकारे, नगरपालिका, प्रातिनिधिक मिशन, व्यावसायिक संघटना, आंतरराष्ट्रीय नेटवर्क आणि पर्यावरण तंत्रज्ञान उद्योगांचे वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते.

९ ते ११ सप्टेंबर दरम्यान चालणारा हा तीन दिवसीय कार्यक्रम 'आयफॅट इंडिया




२०२६', जलसुरक्षा, सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता, महानगरपालिकेचा घनकचरा, रिसायकलिंग आणि चक्राकार साधनसंपत्ती व्यवस्थापन यांवर चर्चा, तंत्रज्ञान प्रदर्शन आणि उद्योग-सरकार यांच्यातील सहकार्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देतो.

अग्निमित्रा पॉल (प्रभारी मंत्री, नगर विकास आणि नगरपालिका व्यवहार, पश्चिम बंगाल सरकार) म्हणाल्या, आयफॅट इंडियाने आम्हाला भारत आणि जगभरातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनातील नवीन तंत्रज्ञान शोधण्याची आणि सर्वोत्तम पद्धती समजून घेण्याची एक उत्तम संधी दिली आहे. ईशा कालिया, IAS (संयुक्त सचिव आणि मिशन डायरेक्टर - NULM व झच् स्वनिधी, गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय) म्हणाल्या, एकाच छताखाली पाणी, सांडपाणी, पंप, नेटवर्क आणि चिखल (स्लज) व्यवस्थापनाशी संबंधित तंत्रज्ञान आणि नवकल्पनांमुळे आयफॅट इंडियामध्ये समजून घेण्यासारखे आणि शोधण्यासारखे बरेच काही आहे.

## रोटरी क्लब ऑफ मुंबई दहिसरच्या रुबी ज्युबिली वर्ष-४० गौरवशाली वर्षांची सेवायात्रा

**मुंबई । प्रतिनिधी**

दहिसर रोटरी क्लब ऑफ मुंबई दहिसरच्या ४०व्या रुबी ज्युबिली वर्षानिमित्त, विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार आणि दिशा देत समाज व राष्ट्राचे भविष्य घडविणाऱ्या शिक्षकांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी 'नेशन बिल्डर्स अवॉर्ड' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात विविध शाळा व महाविद्यालयांतील २९ शिक्षक व मुख्याध्यापकांचा सन्मान करण्यात आला. उडखठ चे शास्त्रज्ञ श्री. प्रभाकर इंगळे हे प्रमुख पाहुणे म्हणून तर मानद



रोटेरियन ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय घुगे विशेष उपस्थित होते. कार्यक्रमाला १९ रोटेरियन व मान्यवरांसह एकूण ६० जणांची उपस्थिती लाभली.या उपक्रमाचे प्रकल्प अध्यक्ष रोटेरियन संतोष शिंदे यांनी उत्कृष्ट नियोजन व समन्वयातून कार्यक्रम यशस्वी केला. क्लबचे मार्गदर्शक झऋः रोटेरियन श्रीरंग प्रभू साहेब यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रोत्साहन व आशीर्वादाबद्दल क्लबतर्फे आभार मानण्यात आले.रोटरी क्लब ऑफ मुंबई दहिसरचे अध्यक्ष रोटेरियन प्रकाश कामठे यांनी सांगितले, शिक्षक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार आहेत. त्यांच्या समर्पणाचा सन्मान करणे ही आमच्यासाठी अभिमानाची आणि कृतज्ञतेची बाब आहे.

## गणरायाच्या आगमनासाठी कर्जत बाजारपेठ सजली!

### सजावटीसह पूजेच्या साहित्याची खरेदी वाढली
### महागाईची झळ, तरी भक्तांचा उत्साह कायम

**कर्जत । जयेश जाधव**

गणरायाच्या आगमनाला आता अवघे दोन दिवस उरले असून, कर्जतसह रायगड जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये गणेशोत्सवाच्या खरेदीची लगबग वाढली आहे. सजावटीचे साहित्य तसेच पूजेच्या साहित्यांनी दुकाने सजली असून, बाजारपेठांमध्ये भक्तांची गर्दी वाढताना दिसत आहे. मात्र, विविध साहित्यांच्या किमतीमध्ये यंदा सुमारे १० टक्क्यांनी वाढ झाल्याने गणेशभक्तांना खरेदीसाठी अधिक पैसे मोजावे लागत आहेत. महागाईची झळ असतानाही बाप्पाच्या स्वागतासाठी भक्तांचा उत्साह कायम असल्याचे चित्र आहे.

**१४ सप्टेंबरला गणरायाचे आगमन**

यंदा १४ सप्टेंबर रोजी घरोघरी गणरायाची प्रतिष्ठापना होणार आहे. घरगुती गणेशोत्सवासह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडूनही गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक सजावटीच्या साहित्याची दुकाने कर्जत, नेरळ, खोपोलीसह जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील बाजारपेठांमध्ये थाटण्यात आली आहेत.दहीहंडी उत्सवानंतर गणेशोत्सवाच्या खरेदीला वेग आला असून, फुलमाळा, वेलवेट तोरण, रुमाल, मोत्यांच्या माळा, कृत्रिम फुले, पडदे, रेडिमेड बॅकड्रॉप, आकर्षक लाईटिंग तसेच विविध प्रकारचे मखर यांना मागणी आहे. कागदी मखरांसह तयार मखरलाही ग्राहकांची पसंती मिळत आहे.यंदा पर्यावरणपूरक सजावटीक डेही अनेक गणेशभक्तांचा कल वाढला आहे. कागद, बांबू, कापड तसेच नैसर्गिक वस्तूंचा वापर करून सजावट करण्याबरोबरच फुलांची आरास करण्याला पसंती दिली जात आहे. कोकणी संस्कृती, वारली कला, ग्रामीण



जीवन, मंदिराची प्रतिकृती आणि फुलांची आरास अशा विविध संकल्पनांवर आधारित सजावटीचे साहित्य बाजारात उपलब्ध झाले आहे. त्यामुळे कमी जागेतही आकर्षक सजावट करण्याचा प्रयत्न केला जात आहे.गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारात विविध प्रकारच्या वस्तू दाखल झाल्या असल्या तरी त्यांच्या किमतीत सुमारे दहा टक्क्यांनी वाढ झाल्याने ग्राहकांमध्ये नाराजी आहे. पूजेचे साहित्य, अगरबत्ती, मेणबत्या, फुलांच्या माळा आणि सजावटीच्या वस्तूंच्या वाढलेल्या किमतीचा थेट परिणाम ग्राहकांच्या बजेटवर होत आहे. मात्र, बाप्पाच्या स्वागतासाठी खर्चाचा विचार बाजूला ठेवून गणेशभक्त मोठ्या उत्साहाने खरेदी करताना दिसत आहेत. गणेशोत्सवामुळे सजावटीसह पूजेच्या साहित्याची विविध दुकाने थाटण्यात आली आहेत. गावपातळीवरील छोट्या बाजारपेठांपासून शहरातील प्रमुख बाजारपेठांपर्यंत नाक्यानाक्यावर विविध वस्तूंची दुकाने सजली आहेत. त्याचबरोबर घरांची साफसफाई, रंगरंगोटी आणि सजावटीची कामेही अंतिम टप्प्यात आली आहेत.गणेशोत्सवाच्या या हंगामामुळे साहित्य विक्रेते, छोटे व्यावसायिक, कारागीर तसेच साफसफाई व रंगकाम करणाऱ्या कामगारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे गणेशोत्सवाचा हंगाम हा छोट्या व्यावसायिकांसाठीही महत्त्वाचा ठरत आहे.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटिंग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५